# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई-४००००१.**

दूरध्वनी- २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०,/५१, फॅक्स नं.२६९२१०२

E_mail desk15@dte.org.in Website :- http://www.dte.org.in


क्रमांक : १५/तंशिसं/अर्थसं/ २०१५-१६/२१६

दिनांक 10 DEC 2015

प्रती ,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे /नाशिक/ अमरावती /नागपूर/औरंगाबाद

विषय :- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत.

संदर्भ :- १) या संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/२३३, दि.२३ मार्च २०१५.

२) या संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/२३४, दि.२४ मार्च २०१५.

३) या संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी परिपत्रक/२०१४-१५/२४६, दि.४ एप्रिल २०१५.

४) या संचालनालयाचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/२०१५-१६/११४, दि.११ ऑगस्ट २०१५.

खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागास वर्गीय पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नोंदणी करणे तसेच आधार कार्ड क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न / लिंक करणे, तसेच विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे सुलभ व्हावे याकरीता संस्था स्तरावर कॅम्प आयोजित करणेबाबत संबंधित एजन्सीशी समन्वय साधणेसाठी संस्थांना सुचना देण्याबाबत कळविले होते.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील आर्थिक मागास पात्र लाभार्थी विद्यार्थ्याचे आधारकार्ड क्रमांक तसेच आधारकार्ड संलग्न केलेले त्यांचे बॅक खाते क्रमांक माहिती संचालनालयाच्या dtemaharashtra.org.in या संकेत स्थळावर **EBC Scholarship** प्रणालीमध्ये अद्यावत करणेबाबत विद्यार्थ्यांना संस्थांनी सुचीत करणेबाबत सुध्दा कळविण्यात आले होते.

EBC

14/12

सहसंचालक तंत्रशिक्षण

प्रादेशिक कार्यालय, नागपूर

आवक 9280

दिनांक 14 DEC 2015

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील पात्र विद्यार्थ्यांचे आधारकार्ड क्रमांक माहिती शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पडताळणीसाठी (**Verification**) पाठविण्यात आली असता, विद्यार्थ्यांनी प्रणालीमध्ये भरलेले आधारकार्ड क्रमांक नावे, माहिती शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध माहितीशी जुळत नाही. आधारकार्ड क्रमांक, नावे इत्यादि तफावत असलेल्या आपल्या विभागातील महाविद्यालयाची नावे, विद्यार्थी संख्या आपणास इमेलद्वारे पाठविण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या Login ID संकेतस्थळावर उपलब्ध् करून देण्यात आलेली आहे. ज्या संस्थामधील विद्यार्थ्यांची नावे शासनाच्या माहीती व तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध् माहीती जुळत नाही. याबाबतची खुलासा संस्थाकडून प्राप्त् करून घेण्यात यावा.

सदर महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची आधारकार्ड क्रमांक, नाव इ.माहिती अचूक भरणेबाबत आपल्या स्तरावर सुचित करण्यात यावे. तसेच त्या विद्यार्थ्यांनी अद्यापपावेतो आधारकार्ड नोंदणी केलेली नाही, त्यांनी आधारकार्ड नोंदणी करुन आधारकार्ड क्रमांक त्यांच्या बँक खातेशी संलग्न करुन संचालनालयाच्या उपरोक्त संकेतस्थळावर माहिती **दिनांक ३० डिसेंबर २०१५ अद्यावत करणेबाबत संस्थांना सुचित करावे**, जेणेकरुन शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणेबाबतची कार्यवाही करणे सुलभ होईल.

**( डॉ. सुभाष महाजन )**
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रती -

१. प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

पृ. क्र.तशिसं/विकाना/ईबीसी/२०१५/ 3817
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक 16 DEC 2015

प्रति,

प्राचार्य, सर्व खाजगी विना अनुदानित/कायम विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर तसेच पदवीका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यांत येते की, पत्रात नमुद केल्याप्रमाणे सदरहू माहिती दिलेल्या मुदतीत संचालनालयाचे संकेतस्थळावर त्वरीत अद्यावत करण्यांत यावी, जेणेकरुन शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणेबाबतची कार्यवाही करणे सोईचे होईल.

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर